# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 03.05.2025** **वार- शनिवार**

---

**अश्विनी वैष्णव**

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते शनिवारी हडपसर जोधपुर एक्सप्रेस आणि एमजीआर चेन्नई सेंट्रल - भगत की कोठी एक्सप्रेसचे उद्घाटन हिरवा झेंडा दाखवून करण्यात आलं. यावेळी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, गजेंद्र सिंह शेखावत, खासदार मेधा कुलकर्णी, श्रीरंग बारणे मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते. तर केंद्रीय मंत्री एल मुरुगन दूरदृष्य प्रणालीच्या माध्यमातून उपस्थित होते.

**कर-सल्लागार**

पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेचं स्वप्न साकार करण्यासाठी कर सल्लागार, सनदी लेखापाल यांच्यासह करदात्यांची भूमिका मोलाची आहे. योग्य करसंकलन आणि व्यवस्थापन, पारदर्शी अर्थव्यवस्था यासाठी आर्थिक क्षेत्रातील व्यवसायिकांनी अर्थकायद्यातील नवे बदल, कृत्रिम बुद्धिमत्ता, चॅट जीपीटीसारखं प्रगत तंत्रज्ञान आत्मसात करायला हवं असं केंद्रीय कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाच्या अपील प्राधिकरणाचे सदस्य बी. एम. शर्मा यांनी सांगितलं. महाराष्ट्र कर सल्लागार संघटनेच्यावतीने आयोजित 'अमृत ज्ञानकुंभ 2025', या दोन दिवसांच्या राष्ट्रीय कर परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते आज बोलत होते. कर सल्लागार : पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे आधारस्तंभ' अशी या कर परिषदेची संकल्पना आहे. या परिषदेत प्रथमच 'टॅक्स का ओपीडी'मध्ये प्राप्तिकर, जीएसटी, रेरा, माहिती अधिकार, एलबीटी, सायबर कायदा यावर तज्ज्ञांचं मार्गदर्शन होणार आहे.

**पाणी**

पुणे महापालिकेनं शहराच्या दक्षिण भागात पाणीकपात करण्यास सुरुवात केली आहे. कात्रज, आंबेगावसह सिंहगड रस्त्यावरील धायरी, हिंगणे, वडगाव बुद्रुक, सन सिटी या परिसरापासून पाणीकपातीला सुरुवात करण्यात आली असून, या भागातील पाणीपुरवठा आता परवा सोमवारपासून आठवड्यातून एक दिवस बंद ठेवला जाणार आहे असं पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकिशोर जगताप यांनी सांगितलं.

**मीटर**

महावितरणमार्फत बसवण्यात येणाऱ्या टीओडी म्हणजे टाइम ऑफ डे मीटरमुळं ग्राहकांना त्यांच्या वीजवापराची माहिती दर तासानुसार उपलब्ध होणार आहे. यामुळं ग्राहकांचं वीज वापरावर आणि पर्यायानं वीज बिलावर नियंत्रण राहणार आहे. तसंच, अचूक आणि वेळेत बिल मिळणार आहे. हे अद्ययावत मीटर बसविल्यानं महावितरणची वाणिज्यिक हानी कमी होणार आहे. तसंच, वीजचोरीवर नियंत्रण येणार आहे. यातून होणाऱ्या महसूलवाढीतूनच टीओडी मीटरचा खर्च केला जाणार आहे.

**म्हाडा**

गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळ म्हणजे पुणे म्हाडा यांच्या डिजीटल स्वाक्षरीची शहानिशा केल्याशिवाय कोणत्याही व्यक्तिसोबत सदनिकेचा विक्री करारनामा करु नये; अन्यथा संबंधित विकासक आणि व्यक्तीवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, असं पुणे म्हाडाच्या वतीनं कळविण्यात आलं आहे. सर्व सोडतींमधील 15 टक्के सामाजिक गृहनिर्माण आणि 20 टक्के सर्वसमावेशक योजनेतील सोडतीनंतर विक्रीअभावी शिल्लक सदनिका 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' या तत्वावर गरजू आणि पात्र लाभार्थ्यांना वितरित करण्यासाठी नोंदणी आणि वितरण प्रक्रिया bookmyhome.mhada.gov.in संकेतस्थळावर सुरु करण्यात आली आहे अशी माहिती उपमुख्य अधिकारी अतुल खोडे यांनी दिली आहे.

**आंदोलन**

पैशांची वाहतूक करणाऱ्या बँक मित्रांना विमा, रजा, वैद्यकीय सुविधा आणि सुट्ट्या मिळाव्यात तसंच बँक मित्रांच्या कमिशनमध्ये वाढ व्हावी आदि मागण्यासाठी राज्य बँक मित्र संघटनेच्या वतीनं पुणे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आंदोलन करण्यात आलं. विविध बँक संघटनांनी त्यांना पाठिंबा देत आंदोलनात सहभाग घेतला.

**कोंडी**

पुण्यातील नरवीर तानाजी मालुसरे रस्त्यावरील उड्डाणपुलावर काल झालेल्या मोठ्या वाहतूक कोंडीनंतर आज शहर वाहतूक पोलीस आणि पुणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी रस्त्याची पाहणी करून सुधारणा करण्यासाठी नियोजन केलं. वडगाव इथल्या पासलकर पूल चौक परिसरातील वाहतूक सुरळीत करण्यासाठी विविध उपायांवर अधिकाऱ्यांची चर्चा झाली.

**बिले**

पुणे महापालिकेच्या मिळकतकर विभागाच्या वतीनं दिल्या जाणाऱ्या बिलांचं वाटप करण्यास सुरुवात

करण्यात आली आहे. पहिल्या दोन दिवसांत नागरिकांनी पाच कोटी रुपयांचा महसूल महापालिकेच्या तिजोरीत जमा केला आहे. महापालिकेच्या उपायुक्त आणि मिळकतकर विभागाच्या प्रमुख प्रतिभा पाटील यांनी ही माहिती दिली.

**शाळा**
पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीनं प्रभाग क्रमांक 18 मधील केशवनगर शाळेच्या नवीन इमारतीचं भूमिपूजन आमदार शंकर जगताप यांच्या हस्ते संपन्न झालं. शाळेच्या नव्या पाच मजली इमारतीसाठी अंदाजे 26 कोटी रुपये खर्चाला महापालिकेने प्रशासकीय मान्यता दिली असून, इमारतीचं काम पुढील 18 महिन्यांत पूर्ण होणार आहे. सुमारे 1150 विद्यार्थ्यांना इथं शिक्षणाचा लाभ होणार आहे.

**पुरस्कार**
"महात्मा बसवेश्वरांचं जीवन कार्य पुढील अनेक पिढ्यांना सामाजिक कार्यासाठी सतत प्रेरणा देत राहील," असं प्रतिपादन खासदार श्रीरंग बारणे यांनी काल केलं. महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि महात्मा बसवेश्वर पुतळा समिती यांच्या वतीनं निगडी इथं आयोजित विशेष कार्यक्रमात बारणे बोलत होते. यावेळी उद्योग क्षेत्रातील लक्षणीय कामगिरीबद्दल उद्योजक एस. बी. पाटील, पत्रकारिता क्षेत्रातील कार्याबद्दल डॉक्टर स्वाती महाळंक, विज्ञान क्षेत्रासाठी डॉक्टर अशोक नगरकर, सामाजिक क्षेत्रासाठी मनोहर दिवाण आणि क्रीडा क्षेत्रातील कामगिरीबद्दल अवधूत भागानगरे यांचा महात्मा बसवेश्वर समाजभूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

**कुस्ती**
बाणेर गावचं ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज उत्सवानिमित्त मॅटवरील राज्यस्तरीय बाणेर केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. यामध्ये नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर यानं हा किताब पटकावला. स्पर्धेत राज्यभरातून 255 मल्ल सहभागी झाले होते. यामध्ये सुजित जाधव, विशाल शिळीमकर आणि अमोल बालगुडे या पुण्याच्या मल्लांनी अनुक्रमे 52, 57, आणि 61 किलो वजनी गटात प्रथम स्थान मिळवलं. महिलांच्या निमंत्रित कुस्तीमध्ये पुण्याची ज्ञानेश्वरी पायगुडे विजेती ठरली. स्पर्धेमध्ये 22 लाख रुपयांपर्यंतची पारितोषिकं देण्यात आली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**